# <u>प्रेसनोट दिनांक १९/०४/२०२३</u>

## कापड विक्री व्यावसायीकास खंडणी मागणा-यांविरुध्द तात्काळ गुन्हा दाखल करुन, एकास अटक.

## खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात छोटे मोठे व्यावसायीक, कंपनी तसेच जनतेकडून कोणत्याही प्रकारे जबदस्तीकरुन, त्यांचेकडून हप्त वसुली करुन, खंडणी गोळा करणाऱ्या इसमाबाबतची माहिती निर्भिडपणे देण्याकरीता पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात पोलीस स्टेशन व खंडणी विरोधी पथकामार्फत दर्शनीय भागावर फ्लेक्स लावुन, नागरीकांना निर्भीडपणे तक्रार द्यावी याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने दिनांक १९/०४/२०२३ रोजी रेडीमेड कापड विक्री व्यावसायीकाने, खंडणी विरोधी पथक कार्यालयात समक्ष हजर राहुन कळविले की, तक्रारदार यांचे पिंपरी मार्केट मध्ये रेडीमेड कापड विक्रीचा व्यवसाय असुन, दिनांक ०८/०२/२०२३ रोजी सायंकाळी ७.३० वा. ते दिनांक १४/०४/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा.चे दरम्यान इसम नामे माधव वाघमारे, आतिश शिरसाट व त्यांचे साथीदार तक्रारदार यांचे दुकानात येऊन, तक्रादार यांना शिवीगाळ करुन, माधव वाघमारे याने तक्रारदार यांना 'तुला कापड दुकान चालवायचे असेल तर दर महिन्याला १०,०००/- रुपये हप्ता द्यावा लागेल, हप्ता दिला नाहीतर तुला दुकानासह जाळुन टाकतो' अशी जिवे मारण्याची धमकी देवुन, ५०० रुपये खंडणी घेतली. माधव वाघमारे याचा साथीदार आतिश शिरसाट याने तक्रारदार यांचे दुकानातील १३५०/- रुपये किंमतीचे ०३ शर्ट जबरदस्तीने घेवुन, तक्रारदार यांचे वडीलांना हाताने मारहाण केली आहे अशी तक्रार दिल्याने, त्याबाबत वपोनि अरविंद पवार यांनी सदर तक्रारीची तात्काळ दखल घेवुन, वरिष्ठांना कळवुन, व्यावसायीकाने दिलेली तक्रार घेवुन, त्याबाबत **पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ४५५/२०२३ भादवि कलम ३८६,३८७,३९२,३२३,५०४,३४ अन्वये तात्काळ गुन्हा दाखल केला आहे.** आरोपी माधव वाघमारे रा.लिंकरोड पत्राशेड, पिंपरी पुणे यास पिंपरी पोलीस ठाणे येथे अटक करण्यात आली असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास पिंपरी पोलीस स्टेशनचे सपोनि कदम हे करीत आहेत.

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**